# सातवाहन

सम्राट अशोकाच्या मृत्यूनंतर मौर्य साम्राज्य क्षीण होऊ लागले. याचवेळी भारताच्या वायव्य सीमेवर ग्रीक, पर्शियन्स, शक, कुषाण इ. परकीयांची आक्रमणे सुरू झाली. मौर्य साम्राज्यातील दूरस्थ प्रांतांनी एकामागून एक स्वतःचे स्वातंत्र्य घोषित करायला सुरुवात केली. याच सुमारास सातवाहन राजघराण्याचा उदय झाला. इ.स.पू. पहिल्या शतकात दक्षिण भारतात सातवाहन घराणे आणि कलिंगचे चेदी घराणे यांनी विध्य पर्वत व त्याच्या आजूबाजूच्या प्रदेशावर स्वतःचा प्रभाव निर्माण केला. चेदी घराण्याची लवकरच इतिश्री झाली परंतु सातवाहनांनी सुमारे ३०० वर्षे राज्य करून स्वतःचे प्रभुत्व कायम राखले..

सातवाहन वंशाचा सर्वप्रथम उल्लेख ऐतरेय ब्राह्मण ग्रंथात आला आहे. विद्वानांच्या मते सातवाहन शब्दाचा अपभ्रंश होऊन तो 'शालिवाहन' या रूपात सर्वत्र प्रसिद्ध झाला. सिमुक या घराण्याचा संस्थापक मानला जातो. पुराणांनुसार सातवाहनांच्या साम्राज्याचा विस्तार उत्तर भारतातही झाला असून मगध त्यांच्या साम्राज्याचा एक भाग होते.

**मूळस्थान –**

सातवाहनांच्या मूळ स्थानाविषयीही अनेक वाद आहेत. पुराणात सातवाहनांना आंध्र, आंध्र-भृत्य आणि आंध्र जातीय म्हटले आहे. त्यावरून रॅप्सन, स्मिथ आणि भांडारकर सातवाहनांना आंध्रप्रदेशाचे निवासी मानतात. स्मिथने त्यांची राजधानी 'श्रीकाकुलम' तर भांडारकरांनी 'धनकेटक' ही सांगितली आहे. सुखटणकर बेलारी जिल्हा त्यांचे मूळस्थान मानतात तर डॉ. रायचौधरींच्या मते मध्यप्रदेशाजवळील 'दक्षिणभूमी' त्यांचे मूळ स्थान होय. हा भाग प्रतिष्ठानला लागून आहे. प्रतिष्ठान म्हणजे आजच्या औरंगाबाद जिल्ह्यातील पैठण होय. यावरून सातवाहन महाराष्ट्राचे निवासी ठरतात. सातकर्णीने आंध्र प्रदेशावर स्वतः चे प्रभुत्व स्थापन केल्यानंतर ते आंध्रप्रदेशाशी इतके एकरूप झाले की पुराणांनी त्यांना आंध्रवंशीय म्हटले आहे. महामहोपाध्याय डॉ. वि.वा. मिराशींच्या मते वऱ्हाड किंवा वैनगंगेच्या तटावरील भूमी हे सातवाहनांचे मूळस्थान होय. सर जदुनाथ सरकार निरनिराळे साहित्य, अभिलेख आणि नाणी यांच्याआधारे प्रतिष्ठान हेच सातवाहनांचे मूळ स्थान सांगतात व बहुतेक विद्वानांना हे मत मान्य आहे.

जैन ग्रंथ 'कालकाचार्य कथानक आणि नियुक्ती सरकारांच्या मताचेच समर्थन करतात. गौतमीपुत्र श्री सातकर्णीच्या कार्ले आणि नाशिक येथील अभिलेखांवरूनही प्रतिष्ठान हीच सातवाहनांची राजधानी असल्याचे स्पष्ट होते. गौतमी बलश्री सातवाहनाच्या अभिलेखात सातवाहनांच्या साम्राज्यविस्ताराचा उल्लेख आहे परंतु त्यात आंध्रप्रदेशचा निर्देश नाही. आंध्रप्रदेश जर सातवाहनांचे मूळस्थान असते तर त्यात आंध्रप्रदेशचा निश्चित उल्लेख असता. वरील सर्व विवेचनावरून तसेच उपलब्ध पुराव्यांवरून प्रतिष्ठान हेच सातवाहनांचे मूलस्थान व राजधानीचे शहर होते हे स्पष्ट होते.

**कालानुक्रम –**

सातवाहनांच्या वंशावळीबद्दल बरेच वाद आहेत. ऐतरेय ब्राह्मण ग्रंथाची रचना इ.स.पू. ५०० पूर्वी झाली होती. त्यात आंध्राचा उल्लेख असून त्यांना दास जातीचे म्हटले आहे. त्या ग्रंथानुसार आंध्र विश्वामित्राचे वंशज असून आर्य वसाहतींच्या सीमेवर राहात. चंद्रगुप्त मौर्याच्या काळात आंध्र गोदावरी आणि कृष्णा नद्यांच्या मुखापाशी राहत. त्यांच्या ताब्यात ३० नगरे व अनेक खेडी असून ते त्यांच्या सैन्यबळासाठी विशेष प्रसिद्ध होते. त्यांच्याजवळ १,००,००० पायदळ, २,००० घोडदळ आणि १,००० हत्ती होते. अशोकाच्या १२ व्या शिलालेखात आंधांचा उल्लेख येतो. त्यात म्हटले आहे. की, “आंध्र आणि पुलिद महाराजाद्वारे घोषित पुण्य धर्माचे अनुसरण करतात." स्मिथच्या मते आंध्र अशोकाचे मांडलिक होते व त्याच्या मृत्यूनंतर इ.स.पू. तिसऱ्या शतकात ते सिमुकच्या नेतृत्वाखाली स्वतंत्र झाले. स्मिथ व डॉ. राजगोपालाचारी पुराणांच्या आधारे सातवाहन साम्राज्याचा कालखंड ४६० वर्षांचा सांगतात. हे मत मान्य केल्यास सातवाहन वंशाची स्थापना इ.स.पू. २३५ मध्ये आणि अस्त इ.स. २२५ मध्ये झाला हे दिसून येते. रॅप्सनने खारवेल हाथीगुंफा अभिलेखातील मौर्य संवताच्या आधारे सातवाहन वंशाची स्थापना इ.स.पू. २२१ ते इ.स.पू. २२० या दरम्यान सांगितली आहे. बहुतेक इतिहासकार सातवाहन वंशाची स्थापना इ.स.पू. पहिल्या शतकात झाल्याचे सांगतात .त्यासाठी पुढील स्पष्टीकरण दिले जाते.

१) शुंग वंशाची स्थापना इ.स.पू. १८६-९८५ च्या दरम्यान झाली त्यांनी इ.स.पू. ७३ ७२ पर्यंत राज्य केले. त्यानंतर कण्वांनी ४५ वर्षे म्हणजे इ.स.पू. २९ राज्यकले. त्याच्यानंतर सातवाहनांची सत्ता सुरू झाली.

२) घाट अभिलेख गौतमीपुत्र सातकर्णी व त्याचा पुत्र सुमायांच्या अपेक्षा वर्षे पूर्वीचा आहे. यात सिमुकच्या पुत्रवधूचा उल्लेख मिळतो.

३) साथीगुंफा अभिलेख इ.स.पू. पहिल्या शतकातील होय. या अभिलेखावरून खारवेल राजाने सातवाहनराजा सातकर्णीला पराभूत केल्याचे दिसून येते.

या सर्व पुराव्यांवरून इ.स.पू. पहिले शतक हे सातवाहनांच्या उदयाचे शतक होय हे स्पष्ट होते.

**सातवाहन घराण्याची स्थापना सिमुक**

सातवाहनांच्या प्रारंभिक इतिहासविषयी मतमतांतरे आहेत. पुराणांनुसार कण्व घराण्यातील शेवटचा राजा सुशर्मनला सातवाहन घराण्यातील सिमुकने ठार मारले व सातवाहन वंशाची स्थापना केली. ही घटना इ.स.पू. 34 च्या आसपास घडली नाणेघाट, नाशिक, सांची आणि हाथीगुफा अभिलेखावरून या घटनेला पुष्टी मिळते. सिमुकने विदिशा व त्याच्या सभोवतालचा प्रदेश शुगांकडून जिंकला असण्याची शक्यता आहे. पुराणात सिमुक', 'सिधुक', 'सिप्रक', 'शिनुक' अशी नावे येतात. ती सिमुकची निरनिराळी नावे आहेत. वायूपुराणात उल्लेख आहे की सिमुक हा सुशर्मन करण्यायन व शुंग शक्तीला नष्ट करून पृथ्वीवर राज्य करेल. "कावा यनस्ततो भृत्य सुशर्माण प्रसद्ध तम् गानां चैव मच्छेष क्षपयित्वा बल तदा, सिंधुको आंध्रजातीय प्राप्स्य तीमा वसुंधराम् (वायूपुराण)

सिमुक हा सातवाहन घराण्याचा संस्थापक मानला जातो. त्याची राजधानी पैठण असून नाशिकच्या सभोवतालचा प्रदेश त्याच्या वर्चस्वाखाली होता. सर्वच पुराणांनुसार त्याने २३ वर्षे राज्य केले. जैन ग्रंथानुसार त्याने अनेक जैन मंदिरे व चैत्य बांधले. परंतु आयुष्याच्या उत्तरार्धात तो अत्यंत अत्याचारी झाल्याने त्याला ठार मारण्यात आले.

सिमुकच्या राज्यविस्ताराविषयी इतिहासकारांत मतभेद आहेत. काही इतिहासकारांच्या मते त्याचे राज्य दक्षिणेपुरतेच मर्यादित होते. परंतु डी.सी. सरकार आणि रॅप्सनच्या मते सिमुकने कण्व राजाला ठार मारून गादी मिळविली असल्याने शुगांकडून कण्वांकडे आलेले विदर्भराज्य त्याच्या ताब्यात असावे.

**काणह किंवा कृष्ण** –

सिमुकनंतर त्याचा धाकटा भाऊ काह किंवा कृष्ण गादीवर बसला. त्याने १८ वर्षे राज्य केले. पुराणांनुसार सिमुकचा मुलगा सातकर्णी हा अल्पवयीन असल्याने सिमुकनंतर कृष्णला गादीवर बसविण्यात आले. याच्या काळात सातवाहनांचे राज्य पश्चिमेला नाशिकपर्यंत पसरले होते. नाशिकच्या एका अभिलेखात त्याच्या एका महामात्राने श्रमणांसाठी गुहा निर्माण केल्याचा उल्लेख आहे. याच्याच काळात नाणेघाटच्या गुंफा खोदल्या गेल्या.

**श्री सातकर्णी प्रथम**

कृष्णनंतर सातकर्णी प्रथम हा गादीवर आला. त्याने 'श्री' आणि 'सातकर्णी' या दोन उपाध्या धारण केल्या होत्या. पुराणात याला कृष्णचा आणि नाणेघाट अभिलेखात सिमुकचा पुत्र म्हटले आहे. डॉ. गोपालाचारी ही त्याला सिमुकचाच पुत्र मानतात. हा अत्यंत पराक्रमी असून त्याने फक्त ९ वर्ष राज्य केले. त्याने महाराष्ट्रातील महारथींच्या (मराठ्यांच्या) 'नागनिका' ऊर्फ 'नयनिका' या राजकन्येशी विवाह केला. नागनिकाच्या नाणेघाट अभिलेखावरून श्री सातकर्णी प्रथमने अश्वमेघ राजसूय, अग्नाध्येय, गावामयन इ. यज्ञ केल्याचे समजते. याच अभिलेखात श्री सातकर्णीला धनदस, कामदस, वरदस आणि पुत्रदस अशा उपाधींनी गौरविले आहे. त्याने केलेल्या यज्ञांवरून त्याच्या विशाल साम्राज्याची कल्पना येते, परंतु त्याविषयी निश्चित सांगता येत नाही. त्याच्या नाण्यांवरून महाराष्ट्राचा बहुतेक प्रदेश, उत्तर कोंकण आणि माळवा त्याच्या साम्राज्याचा हिस्सा होते असे दिसून येते. प्रतिष्ठान ही त्याची राजधानी होती. नाणी, सांची अभिलेख आणि पुराणांवरून असे दिसून येते की पूर्व माळवा प्रदेश ताब्यात आल्यावर त्याने अश्वमेध यज्ञ केला. संपूर्ण विध्यप्रदेश सातवाहनांच्या ताब्यात आणणारा तो सातवाहनांचा पहिला राजा होय. सांची अभिलेखावरून त्याने दोन अश्वमेध यज्ञ आणि एक राजसूय यज्ञ केल्याचे समजते. यज्ञाच्या वेळी त्याने बऱ्याच वस्तू दक्षिणा म्हणून दिल्या. त्यात ४२,७०० गाई, १००० घोडे, १० हत्ती, घोडे असलेला एक रथ, ६०००० कार्षापण (चांदीची नाणी), १७ चांदीचे कलश इ. वस्तू दान केल्याचा उल्लेख आढळतो. याच्या काळातच कलिग नरेश खारवेलने सातवाहनांवर स्वारी करून श्री सातकर्णी प्रथमला पराभूत केले. श्री सातकर्णी या युद्धात बहुधा मारला गेला असावा. याची कारकीर्द इ. स. च्या सुरुवातीला संपुष्टात आली.

**सातवाहनांचे अंध:कारमय युग**

पेरिप्लस आणि इरीथियन' या ग्रंथांवरून कळते की श्री सातकर्णी प्रथमच्या मृत्यूनंतर सातवाहन काही काळ अंधःकाराच्या खाईत फेकले गेले.

**वेदश्री व शक्तीश्री** –

श्री सातकर्णी जेव्हा मृत्यू पावला तेव्हा त्याची वेदश्री व शक्तीश्री ही दोन्ही मुले अल्पवयीन होती. त्यामुळे श्री सातकर्णीची विधवा राणी नागनिकाने आपल्या वडिलांच्या मदतीने राज्यकारभार केला. वेदश्री बालवयातच मरण पावला. नागनिकाला राज्यकारभाराची जबाबदारी स्वीकारावी लागल्याने सातवाहनांच्या पडत्या काळाला सुरुवात झाली असे काही विद्वानांचे मत आहे. हा पडता काळ सुमारे

एक शतक सुरू होता. या काळात या घराण्यात असा एकही शासक झाला नाही की जो स्वत:च्या पूर्वजांचे राज्य व प्रतिष्ठा कायम राखू शकेल. पुराणांमध्ये सातकर्णी प्रथमनंतर पूर्णात्संग गादीवर आल्याचा उल्लेख मिळतो. काही विद्वान सातकर्णी प्रथमनंतर सातकर्णी द्वितीय गादीवर आल्याचे मानतात.

पेरिप्लस या ग्रंथानुसार या वंशात अशांतता आणि अव्यवस्था शकांच्या आक्रमणांमुळे निर्माण झाली..

**सातकर्णी द्वितीय**

हाथीगुंफा आणि भेलसा अभिलेखात सातकर्णी द्वितीयचा उल्लेख येतो. याच्या काळातच पुष्यमित्र शुंगच्या वारसांपैकी कुणीतरी पूर्व माळवा माकडून जिंकला असावा. पुराणानुसार सातकर्णी द्वितीयनंतर लंबोदर व त्यानंतर त्याचा पुत्र अपिलक सातवाहनांच्या गादीवर आला. त्यांच्यानंतरचा महत्त्वाचा शासक म्हणजे कुणाल सातकर्णी. त्याच्याविषयी असा उल्लेख आढळतो की त्याने स्वतःची पत्नी मलयवतीवर आपल्या कैचीसारख्या तीक्ष्ण बोटांनी असा प्रहार केला की राणी मलयवती मृत्यू पावली. उजशेखरलिखित काव्यमीमांसेनुसार कुंतल सातवाहनाने प्राकृत भाषेचा वापर केवळ त्याच्या अंत:पुरातील स्त्रियांनीच करावा असा आदेश काढला होता.

**हाल**

हाल हा सातवाहन वंशातील १७ वा शक्तिशाली राजा होय. त्याने फक्त चार वर्षे राज्य केले. त्याचा उल्लेख पुराने तसेच लीलाबाई, सप्तशती, अभिधान चितामणी, देशीनाममाला इ. ग्रंथांत मिळतो. गाथासप्तशती ही हालची रचना होय. हालचा सेनापती विजयानंदने लंकेवर आक्रमण केले होते. तेथे त्याने लंकेच्या राजकन्येच्या सौदर्याची ख्याती ऐकली ती त्याने हालराजाच्या कानावर टाकल्यावर राजा हालने लीलावतीला हस्तगत करून तिच्याशी विवाह केला. त्याने आग्नेय आशियावर आक्रमण केले असा एका ठिकाणी उल्लेख येतो परंतु विद्वानांचे त्याबद्दल एकमत नाही.

या काळात सातवाहनांना शुंगराजांच्या वारसांशी अनेक युद्धे करावी लागली व त्यात सातवाहनांचा पराभव झाला. शकांनी याच काळात भारतावर आक्रमणे सुरू केली त्यांनी सातवाहनांपासून माळवा, महाराष्ट्र, कोकण व गुजरात हे प्रदेश जिंकले. सातवाहन राजा सातकर्णीच्या मृत्यूनंतर केवळ ५० वर्षांच्या आत विशाल सातवाहन साम्राज्य मोडकळीला आले. म्हणूनच या काळाला सातवाहनांचे अंधःकारमय युग म्हणतात.

**गौतमीपुत्र श्री सातकर्णी - (इ.स. १०६ ते इ.स.१३०)**

गौतमीपुत्र सातवाहनांच्या गादीवर येताच सातवाहनांच्या उत्थानाला पुन्हा सुरुवात झाली. गौतमीपुत्र हा सातवाहन घराण्यातील सर्वश्रेष्ठ राजा होय. याचे राज्य उत्तरेला माळवा ते दक्षिणेला कर्नाटकपर्यंत पसरले होते. आंधप्रदेशही याच्या साम्राज्यात मोडत असावा. नाशिकच्या गुफालेणीत गौतमीपुत्रच्या कार्यांचे सविस्तर विवरण देण्यात आले आहे. हे अभिलेख गौतमी पुत्रच्या शासनकाळाच्या १८ व्या वर्षी कोरले गेले असावेत.

गौतमीपुत्रच्या पराक्रमाची माहिती राजमाता गौतमीच्या नाशिक प्रशस्तीवरून मिळते.

**शक-ग्रीक आणि पल्लवांचा पराभव**

नाशिक गुहालेखांवरून गौतमीपुत्रने - शक, ग्रीक आणि पल्लवांचा पराभव केल्याचे कळते. विद्वानांच्या मते हे ग्रीक आणि पल्लव शकशासकांचे क्षत्रप असावेत व गौतमीपुत्रने त्या क्षत्रपांचा पराभव करून शक ग्रीक आणि पल्लवांचा पराभव केल्याचे अभिलेखात लिहिले असावे.

**क्षहरात वंशाचा नाश**

नाशिकच्या गुहालेखातूनच गौतमीपुत्रने पश्चिम भारतात शासन करण्याऱ्या क्षहरात वंशाचा नाश केल्याचे समजते. याच्या काळात शक सातवाहन संघर्ष चरमोत्कर्षाला पोहोचला होता. सातकर्णी प्रथमच्या दुबळ्या वारसांच्या काळात या संघर्षाली सुरुवात झाली होती. दीर्घ काळ चाललेल्या या संघर्षात विजयाचा लंबक कधी शकांच्या बाजूला तर कधी सातवाहनांच्या बाजूला झुकत असे. विद्वानांच्या मते इ.स.पू. पहिल्या शतकात भारतातून जेव्हा ग्रीकांची सत्ता नष्ट झाली तेव्हा शक या एका परकीय जमातीने प्रवेश केला व कुशाणांच्या अधिपत्याखालील भारताच्या उत्तर दक्षिण आणि पश्चिम भागात शासनकारभार सुरू केला.

**शक सातवाहन संघर्ष**

पेरिप्लसच्या लेखकाने मॅम्बॅरस नावाच्या एका शासकाचा उल्लेख केला आहे. मॅम्बॅरसने भडोच, गुजरात, काठेवाड आणि राजपुतान्याच्या काही भागावर ताबा मिळविला होता. मॅम्बॅरसच्या उदयामुळे सातवाहनांपुढे मोठे संकट उभे राहिले. काही विद्वानांच्या

मते हा मॅम्बॅरस म्हणजेच शक राजा नहपान होय. नहपानने सातवाहनांच्या राज्यातील उत्तरेकडचे प्रदेश जिंकले, एवढेच नव्हे तर त्याने कल्यार बंदरातून चालणाऱ्या सातवाहनांच्या व्यापाराला प्रचंड नुकसान पोहचवले. यामुळे शक- सातवाहन संघर्षाला अधिकच धार चढली. याच वेळी गौतमीपुत्र सातकर्णी हा सातवाहन घराण्यातील सर्वश्रेष्ठ शासक सातवाहनांच्या गादीवर आला व त्याने नहपानच्या चौफेर उधळलेल्या अश्वाला जेरबंद केले.

नाशिक अभिलेखात गौतमीपुत्रला सातवाहनांची प्रतिष्ठा नव्याने स्थापन करणारा म्हणून गौरविले आहे. या अभिलेखांवरून त्याने उत्तरेकडील प्रदेशही जिंकले असल्याचे समजते. विद्वानांच्या मते गौतमीपुत्र गादीवर येण्याच्या काही दिवस अगोदर सातवाहनांच्या साम्राज्यावर एखाद्या विदेशी सत्तेने आक्रमण करून त्यांच्या साम्राज्याच्या उत्तरेकडील काही प्रदेश जिंकला असावा. हा आक्रमक नहपान असण्याचीच शक्यता जास्त आहे. नहपानने जिंकलेले प्रदेश पुन्हा जिंकून गौतमीपुत्रने सातवाहनांची गेलेली प्रतिष्ठ परत मिळविली असावी. त्यामुळेच नाशिक अभिलेखात गौतमीपुत्रला क्षहरात वंशाच नाश करणारा म्हटले आहे. हा अभिलेख गौतमीपुत्रच्या शासनकाळाच्या १८ व्या वर्षातील आहे. नहपानचा मृत्यू इ.स. १२५ मध्ये झाला. याचा अर्थ गौतमीपुत्रने शकांचा नाश इ.स. १२४ च्या पूर्वी आणि प्रामुख्याने नाशिक अभिलेख लिहिण्यापूर्वी केला असावा. अभिलेख आणि नाणी यांच्या आधारे इ.स. ११९ ते १२४ च्या दरम्यान गौतमीपुत्रने शकांचा नाश केला असल्याचे दिसून येते.

नाशिक अभिलेखात एक दानविषयक उल्लेख आहे. त्यानुसार गौतमीपुत्र ग्रामीण भागातील जमिनीचा एक हिस्सा दान दिला. जो आधी नहपानचा जावई उषवदात(ऋषभदत्त) च्या साम्राज्याचा भाग होता. हे दान त्याने वेणाकटकमध्ये (आधुनिक नाशिक जिल्हा) विजयस्कंधावर भागात दिले. यावरून स्पष्ट होते की, या भागातील शक शासकाला जिंकल्यानंतरच गौतमीपुत्रने हे दान दिले असावे. वरील सर्व विवेचनावरून गौतमीपुत्र शकराजा नहपानचा पराभव करून शकांची प्रतिष्ठा धुळीला मिळविली व सातवाहनांचा गौरव वाढविला हे स्पष्ट होते.

नाशिक अभिलेखांवरून कळते की गौतमीपुत्रने वरील विजयांच्या व्यतिरिक्त सौराष्ट्र, अवंती, अनूप, अपरांत इ. प्रदेशही जिंकले. हे सर्व प्रदेश नहपानच्या साम्रज्याचाच भाग असावेत. त्यामुळे नहपानचा पराभव करूनच गौतमीपुत्रने हे सर्व प्रदेश जिंकले असावे.

वरील प्रदेशांव्यतिरिक्त गौतमीपुत्रचा अधिकार ऋषिक (कृष्णा नदीच्या काठावरील ऋषिकनगर जवळचा प्रदेश), मूलक (गोदावरीच्या काठावरील प्रदेश), विदर्भ (भूतपूर्व (ड) याही प्रदेशांवर होता. राजमाता गौतमी बालाश्रीच्या नाशिक प्रशस्तीवरून त्याच्या साम्राज्यात विध्याचल, सातपुडा, अमरावती (दक्षिण भारत) जवळील टेकड्या, निलगिरी टेकड्या, पूर्वघाट आणि पश्चिमघाट हे सर्व प्रदेश मोडत होते. दक्षिणेला गोदावरी ते उत्तरेला माळवा व काठेवाडपर्यंत आणि पूर्वेला वऱ्हाड ते पश्चिमेला कोकणपर्यंत त्याचे साम्राज्य पसरले होते. त्याने स्वतःला विध्य, कक्षावत, परियात्रा, सा, महेंद्र इ. पर्वतांचा स्वामी घोषित केले होते. हे सर्व पर्वत भारताच्या दक्षिण भागात पसरले होते. त्रिसमुद्र-तोय- पित-वाहन' ही उपाधी धारण केली होती. याचा अर्थ ज्याचे घोडे तीन समुद्रांचे पाणी पितात म्हणजेच त्याच्या साम्राज्याच्या सीमा पूर्व पयोधी, पश्चिमसागर व हिंदसागर या तीन समुद्रांपर्यंत पसरल्या होत्या. गौतमीपुत्रच्या या यशाने आनंदित होऊन त्याची आई देवी बालाश्रीने नाशिक जवळील त्रिरश्मा पर्वतावरील गुहेत एक शिलालेख खोदला.

**गौतमीपुत्रची इतर कार्ये**

गौतमीपुत्र सातकर्णीने एका विशाल आणि दीर्घकाळ टिकणाऱ्या साम्राज्याची नव्याने उभारणी केली. तो प्रजाहितदक्ष व उदार होता. कित्येक गुन्हेगारांना त्याने शिक्षेत सूट दिली. त्याने आकारलेले कर धर्मानुकूल होते. तो ब्राह्मण धर्माचा उपासक असला तरी वर्णव्यवस्थेमुळे ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शूद्रात जी संकीर्णतेची भावना निर्माण झाली होती ती नष्ट करण्याचा प्रयत्न केला. त्याने वर्णसंकराला प्रोत्साहन दिले. बौद्ध धर्माप्रती त्याने सहिष्णू धोरणाचा अंगीकार केला. युद्ध आणि शांती या दोन्ही आघाड्यांवर सारख्याच तेजाने तळपणारा गौतमीपुत्र हा सातवाहन वंशातील निःसंशय सर्वश्रेष्ठ सम्राट होय.

गौतमीपुत्र अत्यंत गुणवान व रूपवान होता. त्याचे चारित्र्य निष्कलंक असून त्याला सुंदर शरीरयष्टीचे वरदान लाभले होते. तो अजाणबाहू असून त्याची चाल डौलदार होती. त्याने 'वर-वरण-विक्रय चारूविक्रम' ही उपाधी धारण केली होती. याचा अर्थ असा ज्याची चाल हत्तीसारखी सर्वोत्तम आहे, जो अत्यंत कोमल स्वभाव असून आईचा आज्ञाधारी पुत्र आहे, अत्यंत धाडसी व पराक्रमी असूनही जो आहे, जो गुणीजनांचा चाहता व आश्रयदाता असून जो प्रजेच्या सर्वांगीण उन्नतीसाठी सदैव दक्ष असतो, अर्थात जो सर्वगुणसंपन्न आहे. काही इतिहासकार त्याचा 'विक्रमादित्य' म्हणून उल्लेख करतात. परंतु त्याने ही उपाधी कधीही धारण केली नाही. २४ वर्ष यशस्वी राज्य करून इ.स. १३० मध्ये गौतमीपुत्र मृत्यू पावला.

**वशिष्ठीपुत्र पुलुमायी (इ.स. १३० ते इ.स. १५५) -**

गौतमीपुत्र श्री सातकर्णींच्या मृत्यूनंतर त्याचा मुलगा वशिष्ठीपुत्र सामी- श्री-पुलुमायी हा गादीवर आला. त्याच्या काळात सातवाहनांची सत्ता वैभवाच्या शिखराला पोहोचल होती. वशिष्ठीपुत्रच्या कार्याचा व विजयांचा उल्लेख जुनागढच्या शिलालेखातआढळतो. त्याने वारसाहक्काने मिळालेल्या साम्राज्यात वृद्धी केली. त्याच्या नाण्यांवरून त्या साम्राज्याचा विस्तार दक्षिणेकडे झाला असल्याचे स्पष्ट होते. त्याने 'नवनगर' हे नवीन शहर वसवून 'नवनेगरस्वामी' ही उपाधी धारण केली. त्याने 'महाराज' व दक्षिण पर या उपाधीही धारण केल्या होत्या. त्याने अमरावतीच्या स्तुपाचा आकार वाढवून त्या सुशोभित केले. सुप्रसिद्ध भूगोलशास्त्रज्ञ टॉलेमी त्याचा प्रतिष्ठानचा राजा म्हणून उल्लेख करतो. टॉलेमीने त्याला 'सिरोपोलोमाय' म्हणून संबोधिले आहे. काही इतिहासकारा मते उज्जैनच्या शक महाक्षत्रप रूद्रदामनने त्याचा पराभव करून त्याच्या साम्राज्याच काही भाग जिंकला. जुनागढचा शिलालेख रूद्रदामन व पुलुमायीच्या संबंधांवर प्रकाश टाकतो. पुलुमायी हा रूद्रदामनचा जावई होता. पुलुमायीच्या कारकीर्दीच्या शेवटी शक्तिशाल शकांनी सातवाहन साम्राज्यावर स्वारी केल्याने सातवाहनांना मध्यभारत व गुजरात गमवावा लागले. पुलुमायीने सातवाहनांच्या ताब्यातून गेलेला आंध्र प्रदेश पुन्हा जिंकला. याच्या काळातच प्रतिष्ठान ही सातवाहनांची राजधानी झाली असावी. पुलुमायीच्या नाण्यावार शिडाच्या जहाजाचे चित्र आहे. त्यावरून त्याच्या नाविक शक्तीची व सातवाहनांच्या पूर्वेकडील देशांशी असलेल्या व्यापारासंबंधी कल्पना येते.

**यज्ञश्री सातकर्णी (इ.स. १६५ ते १९५ )** –

यज्ञश्री सातकर्णी ऊर्फ श्रीयज्ञ सातकर्णी हा सातवाहन घराण्यातील शेवटचा कर्तबगार शासक होय. त्याच्या शासनकाळच्या २७ व्या वर्षी लिहिलेल्या कृष्णा जिल्ह्यातील 'चिन्न' या अभिलेखावरून त्याचा कार्यकाल इ.स. १६५ ते इ.स. १९५ असल्याचे कळते. याशिवाय कान्हेरी आणि पांडु लेणी (जि. नाशिक) येथील अभिलेखांवरून त्याचे राज्य पूर्वेकडे बंगालचा उपसागर अि पश्चिमेकडे अरब सागरापर्यंत पसरले होते हे स्पष्ट होते. त्याच्या नाण्यांवरील मासा ,जहाज ही चित्रेही वरील गोष्टीची पुष्टी करतात. वशिष्ठीपुत्र पुलुमायीशी त्याचे नाते कोणते होते हे सांगणे कठीण आहे. त्याची नाणी गुजरात, काठेवाड, पूर्व व पश्चिम माळवा, मध्यप्रदेश व आंध्रप्रदेशात मिळाली. त्याने शकांवर आक्रमण करून त्यांनी सातवाहनांचे जिंकलेले प्रदेश परत मिळविले. त्याच्या एका नाण्यावर एका बाजूला मासा, जहाज व शस्त्राचे चित्र असून दुसऱ्या बाजूस 'रणसामीस श्री यज्ञ सातकर्णी' असे कोरलेले आहे. त्याची काही नाणी ही शकांच्या नाण्यांसारखी आहेतं. ती त्याच्या शकविजयाचा पुरावा देतात. आंध्र आणि महाराष्ट्र या दोन्ही प्रांतांवर त्याचा अधिकार होता.

**शिवश्री पुलुमायी** –

डॉ. गोपालाचारींच्या मते हा वशिष्ठीपुत्र पुलुमायीच्या मुलाचा मुलगा असावा. रूद्रदामनच्या गिरनार अभिलेखावरून त्याने शिवश्रीला पराभूत केल्याचे कळते. सातवाहनांकडून नहपानच्या झालेल्या पराभवाचा बदला घेण्यासाठी रूद्रदामनने सातवाहनांचा पराभव करून अनुप व अपरांत हे प्रदेश काबीज केले.

**श्री शिवखंड सातकर्णी**

हा शिवश्रीचा मुलगा असून त्याने केवळ दोनच वर्षे राज्य केले. त्याच्याविषयी विशेष माहिती मिळत नाही.

**श्रीयान -**

श्रीयानने २९ वर्षे राज्य केले. त्याच्या कान्हेरी, नाशिक आणि गुंटूर अभिलेखांवरून कळते की तो पूर्व, पश्चिम आणि दक्षिणेचा स्वामी होता. याच्या काळात काही पुराणांमध्ये परिवर्तन केले गेले. बाणकवीने श्रीयानचा उल्लेख 'त्रिसमुद्राधिपती असा केला आहे. तसेच त्याला संन्यासी नागार्जुनचा मित्रही म्हटले आहे. त्याची नाणी गुजरात, काठेवाड, सोपार, चांदा, अकोला, गोदावरी व कृष्णा जिल्ह्यांत मिळाली आहेत. त्याच्या शेवटच्या वर्षात आभीरांनी नाशिकच्या सभोवातलचा प्रदेश हस्तगत करून सातवाहनांचे दक्षिणेतील अखंडत्व खंडित केले.

**स्वामी साकेशन** –

श्रीयाननंतर माधवीपुत्र साकेशन गादीवर आला. त्याच्य काही सिंहमुद्रा व हस्तीमुद्रा प्राप्त झाल्या आहेत. यानंतर विजयने ६ वर्षे व वशिष्ठीपु श्रीचंद सातकर्णीने १० वर्षे राज्य केले.

या वंशातील शेवटचा राजा पुलुमायी चतुर्थ होय. याच्या काळात सातवाह साम्राज्याचे पाच तुकडे होऊन त्या पाच भागांवर चतुवंश, पल्लववंश, इक्ष्वाकु वंश, आभीर वंश व वाकाटक वंश यांची राज्ये स्थापन झाली. इ.स. च्या तिसऱ्या शतका पहाट उजाडली परंतु सातवाहन साम्राज्यरूपी सूर्य उगवलाच नाही..

# कुशाण वंश

प्राचीन भारताच्या इतिहासात कुशाण वंशाचे योगदान अत्यंत महत्त्वाचे आहे. प्राचीन काळी शक, पल्लव या टोळ्या भारतात व त्यांनी काही काळ भारतावर राज्य केले. या सर्व टोळ्यांत कुशाण ही सर्वात शक्तिशाली टोळी होती. या टोळीचा भारताच्या राजकीय व सांस्कृतिक जीवनावर दाट प्रभाव पडला. चिनी इतिहासकांच्या मते कुशाण ही यू-ए-ची टोळीचीच एक शाखा होय.

**कुशाणांच्या इतिहासाची साधने –**

कुशाणांची बरीच नाणी व आलेख प्राप्त झाले आहेत. यावरून त्यांचा इतिहास समजण्यास मदत होते. कडफिसस प्रथम आणि कडफिसिस द्वितीय या कुशाण राजांच्या नाण्यावर शिव, नदी व त्रिशुळाची चित्रे आढळतात. यावरून ते शैवपंथीय असावेत असा निष्कर्ष निघतो. नागार्जुनचे 'माध्यमिकासुत' आणि अश्वघोषच्या 'बुद्धचरित' वरून कुशाणांचा इतिहास समजण्यास मदत होते. गांधार शैलीच्या सापडलेल्या मूर्तीवरून कुशाणकालीन कला व धर्माची माहिती मिळते.

**कुशाणांचा उदय**

इ.स.पू. दुसऱ्या शतकात मध्यआशियात अनेक रानटी टोळ्यांची राज्ये होती. यापैकी हू-न्नू या टोळीने यू-ए-ची टोळीचा पराभव केला व तिला चीनमधून हुसकावून लावले. यामुळे यू-ए-ची टोळी पश्चिमेकडे गेली व तिने इली नदीच्या खोऱ्यातील वू-नू टोळीचा पराभव केला. या सुमारास यू-ए-ची टोळीच्या दोन शाखा झाल्या. यापैकी एक शाखा तिबेटकडे गेली व दुसरी इली नदीच्या काठावर स्थायिक झाली. यानंतर यू-ए-ची टोळीचा वू-वू टोळीशी पुन्हा संघर्ष झाला. यावेळी ह-नू ही टोळी वू-नू टोळीच्या मदतीला आल्याने यू-ए-ची टोळीचा पराभव झाला. व या टोळीतील लोक ऑक्सन नदीच्या खोऱ्यात येऊन स्थायिक झाले. या ठिकाणी या टोळीच्या पाच शाखा झाल्या हिउ-मी, शुआंग-मी, फुचुआंग (कुशाण). हित हुम आणि कॉड-फॉड या पाच शाखांत सतत संघर्ष होई शेवटी या संघर्षात कुशाण टोळीचा विजय झाला व तेथून पुढे यू-ए-ची टोळी कुशाण या नावाने ओळखली जाऊ लागली.

**कुजुल कडफिसिस (इ.स.पू. १५ ते इ.स. ६५) –**

कडफिसिस पहिला किवा कुजुल कडफिसिस हा कुशाण वंशातील पहिला पराक्रमी शासक होय. चिनी ग्रंथात त्याला क्यू-क्यू-कियो या नावाने संबोधिले आहे. त्याने यू-ए-चींच्या पाचही शाखांवर अधिकार प्रस्थापित करून राजा ही उपाधी धारण केली. चिनी ग्रंथानुसार त्याने वयाच्या ८० व्या वर्षापर्यंत राज्य केले. पंजतरच्या इ. स. १२२ च्या एका अभिलेखात एका कुशाण शासकाला महाराज म्हणून संबोधिले आहे, यावरून कुजुल कडफिसिसने स्वतंत्र राज्याची स्थापना केली असावी. त्याच्या काही नाण्यांवर शेवटचा ग्रीक राजा हर्मियसचे नाव आढळते. त्याच नाण्यांच्या दुसऱ्या बाजूला त्याचे स्वतः चे नाव आढळते. यावरून काही विद्वानांचा तर्क असा की तो सुरुवातीला काबूलचा ग्रीक राजा हर्मियसचा सामंत असावा. हर्मियसच्या मदतीने कुजुल कडफिसिसने यू-ए-चींच्या चार शाखाचा पराभव केला असण्याची शक्यता विद्वान व्यक्त करतात कुजुल कडफिसिसचे राज्यकाबुल नदीपासून ते सिंधू नदीपर्यत पसरले होते. बेक्ट्रिया, अफगाणिस्थान, पूर्व इराण, वायव्य सरहद्द भारतीय प्रांत त्याच्या साम्राज्यात मोडत होते.

**विम कडफिसिस (इ.स. ६५ ते ७५ ) –**

कडफिसिस प्रथमनंतर त्याचा मुलगा विम कडफिसिस किंवा कडफिसिसहा गादीवर आला.तो महत्त्वाकांक्षी होता. पंजाब आणि मथुरा येथे मिळालेली त्याची नाणी, हाऊ-आन-शुचे भारतासंबंधी उल्लेख, लद्दाख येथे खलासे या ठिकाणी मिळालेला एक अभिलेख आणि मधुरेजवळील मानट येथे मिळालेल्या अभिलेखात अंकित असलेली कडफिसिसची मूर्ती इ. पुराव्यांच्या आधारे त्याच्या राज्यात गांधार, लडाख किंवा लद्दाख, पंजाब आणि पश्चिम-उत्तर भारतातील काही भाग समाविष्ट असावा. डॉ. स्मिथ आणि काही इतर विद्वानांच्या मते त्याचे राज्य पूर्व उत्तरेला वाराणसीपर्यंत पसरले होते. विम कडफिसिसनंतर वर आलेल्या कनिष्काच्या शासनकाळाच्या दुसऱ्या आणि तिसऱ्या व अभिलेखात कौशाम्बी (प्रयाग) आणि सारनाथ (वाराणसी) येथे मिळाले त्यावरून स्मिथच्या विधानाला पुष्टी मिळते. कारण हे अभिलेख कनिष्काच्या शासनाच्या दुसऱ्या व तिसऱ्या वर्षातील आहेत. त्यावरून तो प्रदेश त्याला त्याचा पिता विमकडून असण्याची

शक्यता आहे. बक्सार येथे विम कडफिसिसची काही नाणी आढळून आली यावरून काही विद्वानांनी बिहारही त्याच्या साम्राज्यात मोडत असावे असा तर्क केला आहे.

वरील विवेचनावरून एक गोष्ट स्पष्ट होते आणि तो म्हणजे विमचे राज्य पर्थिया ते मधुरेपर्यंत निश्चित पसरले असून त्यात अफगाणिस्थानात, तुर्कस्थानचा काही प्रदेश, इ. भाग मोडत होता.

बिम कडफिसिसची नाणी ही सुवर्ण व तांब्याची असून त्याच्या एका बाजूला याचे स्वतः चे चित्र अंकित असून दुसऱ्या बाजूला त्रिशुलधारी शिव आणि नंदीचे अंकित आहे. यावरून तो शैव पंथाचा होता है स्पष्ट होते. त्याच्या सर्व नाण्यांवर रोमन शेलीचा दाट प्रभाव दिसून येतो. यावरून या काळात भारत व रोम यांच्यातील व्यापार अत्यंत भरभराटीला आला असावा.

**सम्राट कनिष्क प्रथम**

**कनिष्क कोण होता?**

कनिष्क हा कुशाण घराण्यातील सर्वात पराक्रमी महत्त्वाकांक्षी, विद्वान व सुसंस्कृत सम्राट होता. विम कडफिसिसनंतर तो कुशाणांच्या गादीवर बसला. परंतु त्याचे बिम कडफिसिसची काय नाते होते याविषयी इतिहास अनभिज्ञ आहे. स्मिथच्या मते कनिष्काच्या वडिलांचे नाव वशिष्क असून तो खोतान येथील यू.ए.ची टोळीशी संबंधित होता काही इतिहासकार त्याला विम कडफिसिसचा मुलगा मानतात परंतु याविषयी कोणतेही निश्चित विधान करता येत नाही.

**कनिष्काचे राज्यारोहण**

कनिष्काच्या राज्यरोहण तिथीसंबंधी निरनिराळी मते आढळतात. फ्लिट, कनिगहॅम, केनेडी या विद्वानांच्या मते कनिष्कने त्याच्या राज्यरोहणापासून विक्रम संवत सुरू केला. डॉ. मुजुमदारच्या मते कनिष्काने इ.स. २४८ मध्ये तर डॉ. भांडारकरांच्या मते इ.स २७८ मध्ये राज्यारोहण केले.प्रो. रॅप्सन आणि डॉ. रायचौधरींच्या मते इ.स. ७८ हीं कनिष्काच्या राज्यारोहणाची तिथी असून त्याने शक संवत सुरू केला

**कनिष्काचे साम्राज्यवादी धोरण-**

कनिष्क अत्यंत पराक्रमी आणि महत्त्वाकांक्षी होता. साम्राज्यविस्तार आणि त्यासाठी सतत युद्धे हे त्याच्या कारकीर्दीचे वैशिष्ट्य दिसते. या संदर्भात त्याची तुलना समुद्रगुप्त व अकबराशी केली जाते. त्याच्या राज्यरोहणप्रसंगी त्याच्या साम्राज्यात अफगणिस्थान, बॅक्ट्रिया, पर्शिया, सिध आणि पंजाब हे प्रदेश मोडत होते. त्याने निरनिराळ्या मोहिमा काढून या साम्राज्यात भर टाकली.

**१) काश्मीर मोहीम -**

कनिष्काच्या काश्मीर मोहिमेविषयी सविस्तर माहिती मिळत नसली तरी त्याने काश्मीरवर स्वारी करून तेथे कनिष्कपूर हे नवे शहर वसविले व काश्मीर स्वतःच्या साम्राज्याला जोडले याविषयी दुमत नाही. कल्हणनेही त्याचा राजतरंगिणी या ग्रंथात या घटनेला दुजोरा दिला आहे. डॉ. स्मिथच्या मते काश्मीर मोहीम त्याच्या कारकीर्दीच्या सुरुवातीलाच आखण्यात आली होती.

**२) मगध मोहीम**

बौद्ध साहित्यानुसार कनिष्कने मगध वर स्वारी करून पाटलीपुत्र राजधानीचे शहर जिंकले आणि सुप्रसिद्ध बौद्ध पंडित अश्वघोष याला स्वतःबरोबर नेले. गाझीपूर आणि गोरखपूर येथे कनिष्काची काही नाणी अढळली त्यावरून त्याने मगधाचा काही भाग जिंकला असावा या विधानाला पुष्टी मिळते.

**३) शक क्षत्रपांविरुद्ध मोहीम**

कनिष्काने पंजाब व उज्जैन येथील शक क्षत्रपांचा पराभव केला. हा शक क्षत्रप अत्यंत शक्तिशाली होता. तो बहुधा चष्टन असावा. या पराभवामुळे शकांनी माळव्याचा काही भाग कनिष्काला देऊन त्याचे प्रभुत्व मान्य केले.

**४) चीनविरुद्ध मोहीम**

कनिष्काने पश्चिमेला जाऊन पर्थियाच्या राजाचा पराभव केला. यावेळी चिनी सम्राट हो- तीचा महापराक्रमी सेनापती पान-चाओ साम्राज्य विस्तार करीत पश्चिमेकडे सरकला असताना कनिष्कने स्वतःचा दूत त्याच्याकडे पाठवून त्याच्याकडे चिनी राजकन्येशी विवाह करण्याचा प्रस्ताव ठेवला. पान चाओने हा चिनी सम्राटाचा अपमान समजून कनिष्काच्या दूतालाच कैद केले. याला उत्तर म्हणून कनिष्कने ७०,००० घोडेस्वारांची एक तुकडी पामीरजवळ पान -चाओशी लढा देण्यासाठी पाठविली. परंतु पामीर पठार ओलांडत असताना या सेनेचे इतके हाल झाले की ती पान चाओच्या सेनेपुढे उभीच राहू शकली नाही. कनिष्काला नाईलाजाने चिनी सम्राटाला युद्ध खण्डणी

धावी लागली. दरम्यान सेनापती पान -चाओचा मृत्यू झाला. तेव्हा कनिष्क स्वतः सेना घेऊन गेला. त्याने पामीरचे पठार ओलांडून नवा सेनापती पान चाओचा मुलगा पान- चांगचा पराभव केला व चिनी सम्राटाकडून काश्गर, खोतान आणि याकंद हे प्रदेश मिळविले.

अशा रीतीने त्याचे साम्राज्य पूर्वेला बिहार ते पश्चिमेला खोरासाणपर्यंत आणि उत्तरेला काश्गर ते दक्षिणेला माळवापर्यंत पसरले होते. पुरुषपूर (पेशावर) ही त्याच्या विशाल साम्राज्याची राजधानी होती.

**कनिष्काचे प्रशासन**

कनिष्काच्या प्रशासनाविषयी फार थोडी माहिती मिळते. त्याचे साम्राज्य निरनिराळ्या प्रांतांत विभाजित करण्यात आले असून त्या प्रत्येकावर क्षत्रप नियुक्त करण्यात आले होते. साम्राज्याचे १) राष्ट्र २) अहर ३) जनपद ४) देश किवा विश असे भाग पाडण्यात आले होते. कुशाण प्रशासनाचे वैशिष्ट्य म्हणजे द्वैराज्यपद्धती उदा. कनिष्क द्वितीय आणि हुविष्क यांनी एकाच वेळी संयुक्तरीत्या राज्य केले होते. कुशाण राजांनी स्वतः साठी केसर, महिश्वर, देवपुत्र इ. पदव्या धारण केल्या होत्या. त्यांच्या साम्राज्याच्या वायव्य प्रांतात वेश्यपी आणि लियक नावाचे तर मथुरा आणि वाराणशी येथे अनु महाक्षत्रप खरपल्लान आणि क्षत्रप बनप्पर शासन करीत होते. माळवा, गुजरात आणि काठेवाड येथे क्षहरात वंशाचा होते. साम्राज्याच्या इतर प्रांतांतही असेच क्षत्रप नियुक्त करण्यात आले

**धार्मिक धोरण-**

चतुर्थ बौद्ध परिषदेचे आयोजन ही कनिष्काच्या काळातील अत्यंत महत्त्वाची घटना होय. बौद्ध धर्मात जे विवाद निर्माण झाले होते ते दूर करून बौद्ध तत्त्वज्ञानाला एक व्यवस्थित रूप देण्यासाठी या परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. डॉ. रायचौधरींच्या मते एक महान विजेता यापेक्षा बौद्ध धर्माचा प्रसारक या नात्याने कनिष्काची योग्यता मोठी आहे. कनिष्काने आयोजित केलेल्या चतुर्थ बौद्ध धर्म परिषदेत ५०० बौद्ध भिक्षुनी भाग घेतला. मंगोलियन बौद्ध भिक्षुच्या मते हो परिषद जालंधर येथे झाली. तारानाथ व इतर विद्वान ही परिषद काश्मीरमध्ये सांगतात. ह्यएनत्संग जालंधर येथे गेला होता परंतु तो परिषदेचे स्थान म्हणून जालधरचा उल्लेख करीत नाही. सिंहली महाकाव्याचा आधार घेऊन काही इतिहासकार ही परिषद अनैतिहासिक मानतात परंतु त्याच्या या विधानाला पुरेसा आधार नाही. कारण उत्तर भारत, चीन, मंगोलिया, तिबेट येथील बौद्ध भिक्षु या परिषदेचे सविस्तर वृत्त देतात. नीळकठ शास्त्रीच्या मते या परिषदेचे आयोजन काश्मीरमधील कुडलवन (श्रीनगरजवळ) येथे करण्यात आले होते.

सुप्रसिद्ध बौद्धपंडित वसुमित्र या परिषदेचा अध्यक्ष होता तर अश्वघोष हा उपाध्यक्ष होता. या परिषदेला साम्राज्याच्या निरनिराळ्या भागातून बौद्धपंडित आले होते. या पंडितांची एक समिती स्थापन करण्यात येऊन त्रिपिटकांचे संकलन करून त्यावर संस्कृत भाषेत 'विभाषाशास्त्र' नावाचे भाष्य लिहिण्यात आले. या भाष्याला एका ताम्रपत्रावर लिहिण्यात येऊन ते ताम्रपत्र एका स्तुपात सुरक्षित ठेवण्यात आले. सहा महिने चाललेल्या या परिषदेचे संपूर्ण कामकाज संस्कृत भाषेतून झाले. या परिषदेत महायान पंथाचा उदय झाला व पुढे जगभर हा पंथ लोकप्रिय झाला.

काही इतिहासकारांच्या मते कनिष्क सुरुवातीला बौद्ध धर्मानुयायी नव्हता, परंतु त्याचा सुप्रसिद्ध बौद्धपंडित अश्वघोषशी संबंध आल्यानंतर त्याने बौद्ध धर्म स्वीकारला. डॉ. रायचौधरीच्या मते कनिष्काचे भारतीय इतिहासातील अढळपद हे त्याच्या विजयामुळे नसून त्याच्या धार्मिक कार्यामुळे आहे. बौद्ध ग्रंथांनुसार कनिष्काने बौद्ध धर्म स्वीकारून बौद्ध भिक्षुसाठी अनेक विहार व स्तुप बांधले. चिनी प्रवाशांच्या मते कनिष्कने पुरुषपूर येथे स्तुप बांधून तेथे बुद्धमूर्तीची प्रतिष्ठापना केली. कनिष्क जरी बौद्धधर्मीय असला तरी त्याची इतर धर्मियांप्रती वागणूक अतिशय सहिष्णूतेची होती. डॉ अय्यंगार यांच्यामत कनिष्क ग्रीक आणि झोरोष्ट्रीयन देवतांचाही आदर करीत असे. यावरून तो केवळ बौद्ध धर्मांचाच निस्सिम उपासक होता हे म्हणणे धाडसाचे ठरेल.

**साहित्यनिर्मिती**

कनिष्क हा कुशाण वंशातील सर्वात सुसंस्कृत सम्राट होता.त्याने त्याच्या दरवारात अनेक विद्वानांना उदार आश्रय देऊन त्याना मौलिक साहित्यनिर्मितीसाठी प्रोत्साहित केले. अश्वघोष हा कनिष्काच्या दरबारातील महापंडित हा महान तत्त्वज्ञ कवी व नाटककार होता. कनिष्कने त्याला पाटलीपुत्र येथून आणले होते. त्याचे बुद्धचरित हे महाकाव्य संस्कृत साहित्यातील अमोल ठेवा आहे. यात १७ सर्ग असून महात्मा गौतम बुद्धाचे चरित्र व त्याच्या विचारांचे अतिशय सुंदर वर्णन आहे. अश्वघोषचे दुसरे काव्य म्हणजे 'सौंदरानंद' यात १८ सर्ग (प्रकरणे) असून बुद्धाचा चुलत भाऊ नंदच्या बौद्ध धर्मदीक्षा समारोहाचे वर्णन आहे. 'सारिपुत्र प्रकरण' हे अश्वघोषाने लिहिलेले नाटक असून त्यात ९ अंक आहेत.

नागार्जुन हा या काळातील दुसरा महापंडित त्याने 'प्रज्ञापारमितासूत्र पथ लिहिला ज्यात सापेक्षवादाच्या सिद्धांताची चर्चा आहे.

वसुमित्र या बौद्ध विद्वानाच्या अध्यक्षतेखालीच कनिष्कच्या काळात चतुर्थ बौद्ध धर्मपरिषदेचे आयोजन करण्यात आले होते. याने बौद्ध धर्मावर टीकाग्रंथ लिहिले पार्श्व आणि संघरक्ष हे पंडित याच काळात होऊन गेले. सुप्रसिद्ध आयुर्वेदाचार्य चरक कनिष्कचा राजवैद्य होता. त्याने 'चरक संहिता' हा आयुर्वेदावरील महान ग्रंथ लिहिला. या काळात संस्कृत भाषेत काव्य, नाटक, तत्त्वज्ञान, आयुर्वेद इ. क्षेत्रात विपुल साहित्यरचना झाली.

**कलानिर्मिती** –

कलेच्या क्षेत्रात कनिष्काचे योगदान लक्षणीय आ.हे त्याने त्याच्या पुरुषपूर या राजधानीत ४०० फूट उंच आणि १३ मजले असलेला एक मनोरा बांधला. याच्या डोक्यावर लोहछत्र होते. इ.स. ६ व्या शतकात सॉंग-चुन हा चिनी यात्रेकरू भारतात आला होता. त्याच्या लिखाणावरून त्याच्या काळापर्यंत हा मनोरा तीन वेळा आगीच्या भक्ष्यस्थानी पडला होता व तीन वेळा त्याचे पुनर्निर्माण झाले होते. याच्या शेजारीच एक देखणा विहार बांधण्यात आला होता.

इ.स. ९ व्या व १० व्या शतकापर्यंत हा विहार बौद्धशिक्षणाचे एक महत्त्वाचे केंद्र होते. मगध राजपुत्र वीरसेनने याच विहाराचा उल्लेख केला आहे. याशिवाय कनिष्कने तक्षशिला येथे सिरमकस्थानी एक नगर वसविले तसेच पुरुषपूर येथे दुसऱ्या एका नगराची उभारणी केली. त्याने पेशावर, तक्षशिला, मथुरा इ. शहरांचे सौंदर्यीकरण केले.

या सुमारास सारनाथ, मथुरा, अमरावती आणि गांधार ही शहरे मूर्तिकलेची केंद्रे म्हणून प्रसिद्ध झाली होती. मथुरा येथे मांटनामक स्थानी कनिष्कची एक भव्य मूर्ती मिळाली आहे दुर्दैवाने या मूर्तीचे मस्तक नाहीसे झाले आहे. कनिष्कच्या काळात गौतम बुद्धाच्या मूर्ती मोठ्या प्रमाणात निर्माण होऊ लागल्या. या काळात तयार झालेल्या मूर्तीमध्ये भारतीय व विदेशी मूर्तीकला शैलीचे मिश्रण आढळून येते. अशा प्रकारच्या मूर्ती गांधार प्रदेशात मोठ्या प्रमाणात प्राप्त झाल्याने या मूर्तीकला शैलीला 'गांधार शैली' हे नाव देण्यात आले आहे. या मूर्ती पाटीसाठी वापरण्यात येणाऱ्या दगडापासून बनविण्यात आल्या आहेत. मूर्तीकलेच्या क्षेत्रात मथुरा शैलीचाही या काळात विकास झाला. या शैलीच्या मूर्ती लाल दगडांपासून बनविण्यात आल्या होत्या.

**कनिष्काची नाणी** –

कनिष्काची सुवर्णनाणी मोठ्या संख्येने मिळाली आहेत. त्यावरून तत्कालीन समृद्ध जीवनाची कल्पना येते. त्याच्या काही नाण्यांवर उभ्या असलेल्या राजाची प्रतिमा आहे तर काही नाण्यांवर पँथियन देवतांची चित्रे आहेत. यावर ग्रीक लिपीत काही दंतकथाही लिहिण्यात आल्या आहेत. काही नाण्यांवर 'ना कानिष्की कोपानो' असे लिहिले असून दुसऱ्या बाजूला निरनिराळ्या देवतांची चित्रे आहेत. ही सर्वच नाणी अतिशय कलात्मक आहेत.

**कनिष्काचा मृत्यू** –

कनिष्काने इ.स. ७८ ते १०१ असे २३ वर्ष अत्यंत यशस्वीपणे राज्य केले. काही इतिहासकारांच्या मते त्याचा मृत्यू अतिशय हृदयद्रावक रीतीने झाला. या इतिहासकारांच्या मते कनिष्काच्या सेनाधिकाऱ्यांनी त्याचा कट करून वध केला परंतु याला पुरेसा पुरावा नाही.

**कनिष्काची योग्यता**

भारताच्या इतिहासात जे महान राज्यकर्ते होऊन गेले. त्यांच्यात कनिष्काचे नाव आवर्जून घ्यावे लागते. इतिहासकार कनिष्काला सम्राट अशोक समुद्रगुप्त, हर्षवर्धन, अशोक यांच्या पंक्तीत बसवितात यावरून कनिष्काच्या योग्यतेची कल्पना यावी. डॉ. त्रिपाठींच्या मते "कनिष्क हा चंद्रगुप्त मौर्यासारखा महान पराक्रमी व अशोकासारखा धार्मिक होता. "

**१) बलदंड पुरुष -**

कनिष्काच्या मिळालेल्या नाण्यांवर त्याची जी प्रतिमा आहे ती बलदंड पुरुषाची आहे. सिहासारखी छाती व अजाणबाहू असलेला कनिष्क हा शौर्य, धाडस आणि पराक्रमाचा मूर्तिमंत पुतळा होता त्याला साथ होती सद्गुणांची व अनेकांगी व्यक्तिमत्त्वाची.

**२) महान विजेता**

पराक्रम व मिळविलेल्या विजयाबाबत कनिष्काची तुलना फक्त समुद्रगुप्त व अकबराशीच होऊ शकते. कनिष्काने भारत व भारताबाहेरील विशाल भूभागावर स्वतःचे अधिराज्य निर्माण केले. अफगाणिस्थान, बॅक्ट्रिया, काश्गर, यार्कंट, खोतान हे भारताबाहेरील आणि काश्मीर, पंजाब, सिंध, उत्तरप्रदेश, बहुधा पूर्व बिहार इतका प्रचंड भूप्रदेश त्याच्या साम्राज्यात मोडत होता. बलाढ्य चिनी सम्राटाला कनिष्कपुढे शरणागती पत्करावी लागून स्वतःच्या साम्राज्याचा काही भाग तोडून द्यावा लागला होता.

**३) कुशल प्रशासक** –

कनिष्काने विशाल भूप्रदेशावर अत्यंत यशस्वीपणे राज्य केले. राज्याचे प्रशासन योग्य रीतीने चालविण्यासाठी त्याने सुयोग्य अधिकाऱ्यांना महत्त्वाच्या जागावर नियुक्त केले होते. दूरच्या प्रांतांचा राज्यकारभार महाक्षत्रप व क्षत्रपाद्वार तर राजधानी व त्याच्या आजूबाजूच्या प्रदेशांचा कारभार स्वतः कनिष्क पाहत असे. त्याच्या २३ वर्षांच्या कारकीर्दीत एवढ्या विशाल साम्राज्याच्या कोणत्याही भागात त्याच्याविरुद्ध प्रजेने बंड केल्याचे आढळत नाही यावरून त्याच्या कुशल प्रशासनाची कल्पना यावी.

**४) थोर धर्मप्रचारक** –

कनिष्क हा बौद्ध धर्माचा थोर प्रसारक होता. त्याचे इतिहासातील स्थान हे त्याने मिळविलेल्या महान विजयापेक्षा त्याने बौद्ध धर्माच्या प्रसारासाठी जे प्रयत्न केले त्यावर अवलंबून आहे. त्याच्या काळात काश्मीरमध्ये श्रीनगरजवळ कुडलवन येथे चतुर्थ बौद्ध धर्मपरिषदेचे आयोजन करण्यात आले. याच परिषदेत महायान या पंथाचा उदय होऊन हा पथ जगभर पसरला व अत्यंत लोकप्रिय झाला. महायान पंथीय बौद्ध धर्माचा जगभर प्रसार करण्यात कनिष्काचा वाटा सिहाचा आहे.

**५) विद्वानांचा आश्रयदाता**

कनिष्क रसिकाग्रणी होता. स्वतः विद्वान असल्याने निरनिराळया क्षेत्रातील धुरिणांना त्याने स्वत च्या दरबारात मानाच्या जागा दिल्या. अश्वघोष, वसुमित्र, पार्श्व (बौद्धपंडित), नागार्जुन (मुत्सद्दी), चरक (ख्यातनाम वैद्य) असे तत्कालीन जगातील निरनिराळया क्षेत्रातील अग्रगण्य विद्वान त्याच्या दरबारात होते.

**६) कलेचा भोक्ता** –

कनिष्काच्या काळात निरनिराळया कलांना प्रचंड प्रोत्साहन मिळाल्याने त्यांचा लक्षणीय विकास झाला. विशेषत. या काळात भारताने वास्तुकला आणि मूर्तिकलेच्या क्षेत्रात कौतुकास्पद प्रगती केली. त्याने पुरुषपूर (पेशावर) येथे १३ मजली व ४०० फूट उंचीचा एक स्तंभ बांधला या स्तंभाजवळच एक सुंदर बौद्ध विहार बांधण्यात आला. कनिष्काने तक्षशिलेजवळ 'सिरमक' आणि काश्मीरमध्ये 'कनिष्कपूर' ही दोन नवीन शहरे वसवली. त्याच्या काळात मूर्तिकलेच्या क्षेत्रात 'गांधार' व 'मधुरा" शैलीने विलक्षण प्रगती केली. हाएनत्संगच्या मते त्याने अनेक विहार व स्तूप बांधले.

वरील विवेचनावरून कनिष्क हा महान विजेता, कुशल प्रशासक, धोर धर्मप्रसारक आणि विद्या व कलांचा भोक्ता व आश्रयदाता असलेला असामान्य योग्यतेचा सम्राट होऊन गेला हे दिसून येते. काही इतिहासकार कनिष्काची योग्यता सांगताना त्याला प्रतिअशोक ठरविण्याचा अट्टाहास करतात अशोक हा आदर्शवादी होता तर कनिष्क व्यवहारवादी हे ध्यानात ठेवूनच दोघांची तुलना योग्य ठरेल दोघेही आपापल्या परीने महान होते.

**कनिष्कानंतरचे कुशाण राजे**

**वशिष्क** –

कनिष्कानंतर वशिष्क गादीवर आला. त्याचे दोन आलेख मथुरा आणि सांची येथे आढळले आहेत परंतु त्याची नाणी आढळली नाहीत. त्याच्या शासनकाळात कुशाण साम्राज्याचे दूरवरचे प्रांत कुशाणांच्या ताब्यातून गेले असण्याची शक्यता विद्वान वर्तवितात. त्याने जुष्कपूर हे शहर वसविले असावे.

**हुविष्क** –

वशिष्कनंतर हुविष्क गादीवर आला. त्याने ३० वर्षे राज्य केले. तो अत्यंत पराक्रमी असून वशिष्काच्या काळात कुशाणांचे गेलेले वैभव त्याने परत मिळविले. त्याचे काही आलेख व नाणी मथुरा, वायव्य सरहद्द प्रांत आणि पूर्व अफगाणिस्थानात सापडली. यावरून त्याने वशिष्काच्या काळात गमविलेले हे प्रांत पुन्हा मिळविले असावे. गया येथे सापडलेल्या त्याच्या आलेखावरून त्याचे राज्य पूर्वेला बिहारपर्यंत पसरले असावे. हुविष्क हा बौद्ध धर्माचा पुरस्कर्ता असून त्याने मथुरा येथे एक बौद्ध विहार बांधला त्याच्या नाण्यांवर ग्रीक, इराणी आणि भारतीय देवतांच्या प्रतिमा आढळतात. त्यावरून त्याची धार्मिक सहिष्णुता दिसून येते. त्याने इ.स. १३८ पर्यंत राज्य केले.

**वासुदेव प्रथम**

हुविष्कनंतर वासुदेव प्रथम हा गादीवर आला. त्याने इ.स. १७६ पर्यंत राज्य केले. काही इतिहासकारांच्या मते हुविष्कनंतर कनिष्क द्वितीय हा गादीवर आला. वासुदेव प्रथमची नाणी पंजाब व उत्तर प्रदेशात आढळली. या काळात अफगाणिस्थान, काश्मीर, सिध आणि माळवा हे प्रांत कुशाण साम्राज्यातून फुटून निघाले होते. याच्या काही नाण्यावर शिव व नंदीच्या प्रतिमा आहेत त्यावरून तो शैव पंथाचा असावा.

**कुशाण साम्राज्याचा अंत**

वासुदेव प्रथमनंतर कनिष्क तृतीय हा गादीवर आला असावा त्याने ८० वर्ष राज्य केले. परंतु त्याच्याविषयी निश्चित माहिती मिळत नाही. कनिष्क तृतीय नंतर वासुदेव द्वितीय गादीवर आला. डॉ. अळतेकरांच्या मते वासुदेव द्वितीयने इ.स. २१० ते २३० पर्यंत राज्य केले.

वासुदेव द्वितीयच्या मृत्यूनंतर कुशाण साम्राज्याला उतरती कळा लागून एकामागून एक प्रांत कुशाण साम्राज्यातून फुटून स्वतंत्र होऊ लागले. याच सुमारास नाग, भारशिव मालव या नवीन सत्तांचा उदय झाला आणि कुशाणांचा सूर्य कायमचा अस्ताला गेला.